महाराष्ट्र शासन
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग
मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक - 422101
दूरध्वनी क्र. : 0253-2461439 ईमेल : dycomplan.nashik@maharashtra.gov.in
विभागाचे नाव: नियोजन शाखा संकलन: नियोजन

दि. स्वाक्षरी खाली नमूद आहे

प्रति,
मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती,
नाशिक

**विषय:** दिनांक ०४ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, मा. अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन २०२७ अंतर्गत दिनांक ०४ मार्च २०२५ रोजी दुपारी ०४:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत सादर करण्यात येत असून मा. विभागीय आयुक्त महोदय यांचे सूचनेनुसार इतिवृत्तात नमूद सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा, ही विनंती.

आपला,
Signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 10-03-2025 18:13:55
(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त नियोजन
नाशिक विभाग, नाशिक

**जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिकच्या बैठकीचे इतिवृत्त.**

दिनांक- 4 मार्च 2025, वेळ सायंकाळी 04:00 वाजता.
स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.
बैठकीचे अध्यक्ष- डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक.

बैठकीच्या सुरुवातीला श्री. जलज शर्मा, सदस्य सचिव, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांनी बैठकीच्या विषयांची पार्श्वभूमी विषद केली. सदर बैठकी दरम्यान विविध मुद्यांवर चर्चा झाली. त्यातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| **अ** | **सर्वसाधारण सूचना** | |
| 1 | नाशिक शहर आणि परिसरातील सर्व शासकीय विभागांच्या अधिपत्याखालील शासकीय जमिनी चिन्हांकित करून एकाच नकाशावर दर्शवाव्यात, जेणेकरून जमीनविषयक निर्णयप्रक्रीया सुलभ हाईल. | जिल्हाधिकारी |
| 2 | कुंभमेळ्याशी संबंधित कामांच्या अनुषंगाने दीड- दोन वर्ष कामाचा कालावधी असणा-या निविदा लवकरात लवकर प्रकाशित कराव्यात. | सर्व विभाग |
| 3 | नाशिक महानगरपालिकेच्या GIS पोर्टलवर सर्व विभागांच्या आत्तापर्यंत नोंदणी केलेल्या कामांचा/ प्रकल्पांचा आढावा दिनांक 11/03/2025 रोजीच्या साप्ताहिक बैठकीमध्ये सादर करण्यात यावा. | नाशिक महानगरपालिका व जिल्हाधिकारी |
| **ब** | **रस्ते, दळणवळण व गर्दी व्यवस्थापन** | |
| 1 | कुंभमेळ्यास येणाऱ्या भाविकांच्या अनुषंगाने सर्व गर्दी व्यवस्थापन व वाहतुकीचा आराखडा तसेच पोलीस विभागाशी संबंधित इतर बाबींचा आराखडा तयार करून दिनांक 11/03/2025 रोजीच्या साप्ताहिक बैठकीत सादर करण्यात यावा. | नाशिक शहर पोलीस व नाशिक ग्रामीण पोलीस |
| 2 | नाशिक आणि त्र्यंबकेश्वर शहराभोवतीच्या सर्व अस्तित्वातील रस्ते आणि घाटांचा प्रभावी उपयोग करण्यात यावा. आवश्यक वाटल्यास अधिक घाट आणि रस्त्यांचे बळकटीकरण प्रस्तावित करावे. | नाशिक शहर पोलीस व नाशिक ग्रामीण पोलीस |
| 3 | सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रस्तावित वाहनतळांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या संयुक्त दौऱ्याचे आयोजन करण्यात यावे आणि वाहनतळांच्या जागा निश्चित कराव्यात. | सार्वजनिक बांधकाम विभाग<br>जिल्हाधिकारी |
| 4 | ब्रम्हगिरी प्रदक्षिणा मार्ग तसेच अंजनेरी परिसर विकसित करण्याचे नियोजन करण्यात यावे. | वन विभाग |

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| **क** | **स्वच्छता** | |
| 1 | तात्पुरते शौचालय तयार करणाऱ्या किंवा देणा-या भारतातील विविध कंपन्यांकडे पर्याय तपासावेत. | नाशिक महानगरपालिका |
| **ड** | **गोदावरी नदी** | |
| 1 | त्र्यंबकेश्वरपासून ओढापर्यंत घाट बांधण्याच्या शक्य तितक्या अधिक जागा निश्चित कराव्यात त्यात नाशिक आणि त्र्यंबकेश्वर शहरातील/ शहरानजिकच्या जागांना प्राधान्य द्यावे. | जलसंपदा विभाग (नाशिक पाटबंधारे विभाग/ NID) नाशिक महानगरपालिका |
| 2 | नदीतील पाण्याचा प्रवाह कायम ठेवण्यासाठी बेझे कश्यपी आणि गंगापूर तलावात पुरेसे पाणी राहणे आवश्यक आहे. येत्या दोन्ही उन्हाळयांमध्ये येथे गाळ काढण्याचे काम व्यापक प्रमाणावर हाती घ्यावे. | जिल्हाधिकारी, जलसंपदा विभाग (NID) |
| 3 | सिंहस्थ कुंभमेळयासाठी जलसंपदा विभागामार्फत आवश्यक ते पाण्याचे आरक्षण ठेवण्याची प्रक्रिया करावी. त्र्यंबकेश्वर येथील गोदावरी नदीत पाणी राहील याकरिता तेथील स्टोरेज टँक/ साठवण तलाव आणखी मोठा करता येईल किंवा इतर कोणत्या उपाययोजना करता येईल किंवा कसे याबाबत नियोजन करावे. | जलसंपदा विभाग |
| **ई** | **साधुग्राम** | |
| 1 | सध्याचे प्रस्तावित साधुग्रामसाठी असलेली आरक्षित जागा पुरेशी वाटत नसल्यामुळे आणि मोठ्या प्रमाणावर भाविक अपेक्षित असल्यामुळे आणखी जागा वाढविण्यात यावी. यासाठी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. | NMRDA, नाशिक महानगरपालिका व नप त्र्यंबकेश्वर |
| **फ** | **सीसीटीव्ही व सार्वजनिक ध्वनीक्षेपक यंत्रणा** | |
| 1 | नाशिक शहराच्या नकाशामध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची ठिकाणे दर्शवावित आणि दिनांक 11/03/2025 रोजीच्या साप्ताहिक बैठकीत सादर करावी. | NMSCDCL |

याशिवाय इतरही सूचना देण्यात आल्या, आणि त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देवून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 10-03-2025 17:31:22

(डॉ. प्रवीण गेडाम)
अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती,
तथा विभागीय आयुक्त, नाशिक.